# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 11 October 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ११ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

दहशतवाद जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी गंभीर धोका असल्याचं असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांनी लाओसमध्ये आज १९ व्या पूर्व आशिया शिखर परिषदेला संबोधित केलं. तत्पूर्वी, त्यांनी अमेरिकेचे संरक्षणमंत्री ब्लिंकन यांची भेट घेतली, अमेरिकेत चक्रीवादळामुळं झालेल्या जिवितहानीबद्दल पंतप्रधानांनी शोक व्यक्त केला. पंतप्रधान मोदी आज दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी लाओसच्या पंतप्रधानांसमवेत द्वीपक्षीय चर्चा करणार आहेत.

****

केंद्र सरकारचा इलेक्टॉनिक तसंच माहिती तंत्रदून्ान विभाग आणि राज्य सरकारमध्ये रोबोटिक आणि स्वयंचलित तंत्रदून्ान विकासासाठी करार करण्यात आला आहे.केंद्रिय मंत्री अश्वनी वैश्नव आणि राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नवी दिल्ली इथं आज या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

****

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर आजपासुन दररोजी हवाई दलाचे सुखोई ३० विमान उड्डाण करणार आहे. तर लष्कराचे विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरणार आहे. थोड्याच वेळात या कार्यक्रमला सुरुवात होणार आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची उपस्थिती असणार आहे.

****

राज्यातील चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रातील बदलत्या पद्धतींच्या अनुषंगानं राज्य सरकारनं "चित्रपट धोरण समिती" गठीत करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळं राज्यातील चित्रपटसृष्टीला नवी दिशा मिळणार असून या समितीमार्फत राज्यातील चित्रपट निर्मिती केंद्रांना प्रोत्साहन देणं, तांत्रिक तसंच कौशल्य

विकासाच्या क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध करण्याबाबत धोरण आखण्यात येणार आहे. राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती काम करणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ निर्मात्या स्मिता ठाकरे असणार आहेत, तर निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तांत्रिक तज्ञांच्या समावेशानं ही समिती बळकट होणार आहे.

****

संरक्षणमंत्री राजनाथसिंह कमांडर परिषदेत सहभागी होण्यासाठी आज सिक्कीम दौऱ्यावर आहेत. गंगटोक इथं प्रथमच होणाऱ्या परिषदेत महत्त्वाची रणनिती आणि संरक्षण क्षेत्राच्या सज्जतेवर विचारविनिमय होणार आहे.

****

देशाचं वस्त्रोद्योग क्षेत्र २०३० पर्यंत ३५० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज वस्त्रोद्योग विभागानं वर्तवला आहे. ऑगस्ट २०२४ च्या व्यापार आकडेवारीनुसार तयार कपड्यांच्या निर्यातीत ११ टक्के वार्षिक वाढ झाली. गुंतवणूक आणि निर्यातीला सर्वाधिक प्रोत्साहन देणाऱ्या भारताच्या अंतर्गत क्षमता आणि मजबूत धोरणात्मक चौकटींमुळं ही वाढ अपेक्षित आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकार अनेक योजना आणि धोरणात्मक उपक्रम राबवत आहे. पुढील ३ ते ५ वर्षांत पंतप्रधान मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रिजन ॲपरेल पार्क आणि उत्पादन आधारित प्रोत्साहन योजनेद्वारे ९० हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक अपेक्षित असल्याचं याबाबतच्या बातमित म्हटलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीची जिल्हा प्रशासनाकडून जोरदार तयारी केली जात आहे. जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघांसाठी एकूण ३० हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी दिली.

****

राज्यातील दुसरे सौरग्राम होण्याचा माण पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या टेकवडी गावानं पटकावला आहे. १ हजार २३९ लोकसंख्येच्या या गावातील सर्वच घरगुतीसह ७४ वीज जोडण्यांना सौर ऊर्जा प्रकल्पांतून वीजपुरवठा सुरु झाला आहे. महावितरणकडून राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम असून त्यात टेकवडी गावाची निवड झाली होती. यात सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडीनं प्रथम क्रमांक पटकावला होता.

****

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्तं नागपुरात दीक्षाभूमी इथं कालपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, आर्य भदंत सुरई ससाई यांच्या उपस्थितीत अनेक उपासक आणि श्रामणेर यांना धम्मदीक्षा देण्यात आली. हा धम्मदीक्षा सोहळा उद्यापर्यंत चालणार आहे. दीक्षा घेण्यासाठी अनेक अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत.

****

हवामान

राज्यात आज बहुतांश जिल्ह्यात पावसाचा अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

****

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त आज धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी देवीची महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. काल देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांना धर्म रक्षणासाठी तुळजाभवानी मातेने भवानी तलवार दिल्याची, आख्यायिका यामागे सांगितली जाते.

****